University Election
Top priority

# मुंबई विद्यापीठ

email-arelection@election.mu.ac.in
Tel.No. - 022-2270 8710/22708798

## अधिसूचना

क्र.नि.वि./२५(२) (आर)/ १६५ /२०१५
दि. २९ जून, २०१५.

मुंबई विद्यापीठाच्या पदवीधरांना या अधिसुचनेद्वारे असे कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ४२ नुसार मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवरील पदवीधर मतदार संघातील दहा सभासदांची मुदत ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे उपरोक्त अधिनियमाच्या कलम ९९ नुसार ज्यांनी मुंबई विद्यापीठाची पदवी प्राप्त केलेली आहे अशा इच्छुक व्यक्तींची विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदवहीत नावे नोंदविण्याचे काम ही अधिसूचना जाहीर केल्यापासून सुरु करण्यात येंत आहे. इच्छुक उमेदवारांनी/पदवीधरांनी विद्यापीठाने विहित केलेला नमुना अर्ज 'अ' आणि निश्चित शुल्क रु. २०/- भरून सादर करावा. त्याचप्रमाणे यापुर्वी ज्या पदवीधरांनी मुंबई विद्यापीठात पदवीधर म्हणून नावनोंदणी केली असेल, अशा व्यक्तींनी नमुना अर्ज 'ब' भरुन मतदार यादीत नाव नोंदवावीत. नोंदवहीत नाव नोंदणीसाठी पुन्हा अर्ज 'अ' भरण्याची आवश्यकता नाही. (पुर्वी नावनोंदणी केलेल्या उमेदवारांची यादी विद्यापीठ संकेत स्थळावर उपलब्ध आहे.)

मुंबई विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत संबंधित पदवीधरांची नावे नोंदविण्याकरीता विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या अर्ज 'अ' तसेच मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी अर्ज 'ब' मध्ये ऑनलाईन प्रणालीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन प्रणालीने अर्ज भरताना संकेत स्थळावर दिलेल्या सुचनांचे काटेकोर पालन करावे.

त्याचप्रमाणे पदवीधर विद्यार्थ्यांना नावनोंदणीकरीता ऑनलाईनची सुविधा नसल्यास विद्यापीठाने ऑफलाईन नमुना अर्ज 'अ' आणि नमुना अर्ज 'ब' देखिल उपलब्ध केलेला असून सदर अर्ज कार्यालयीन वेळेच्या दिवशी खालील ठिकाणी बुधवार दिनांक १ जुलै, २०१५ पासून शुक्रवार, दिनांक ३१ जुलै, २०१५ पर्यंत सार्वजनिक सुट्टी, रविवार, दुसरा व चौथा शनिवार या दिवसांव्यतिरिक्त उपलब्ध होऊ शकेल.

१. स्थानापन्न उपकुलसचिव, निवडणूक विभाग, मुंबई विद्यापीठ, कक्ष क्र. ११०, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२.
२. नवी मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील मुंबई विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांची कार्यालये.
३. सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र, मुंबई विद्यापीठ,पी-६१,एम्.आय.डि.सी., मिरजोळे, रत्नागिरी- ४१५ ६३९.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट घेवून तसेच ऑफलाईनने सादर करु इच्छिणा-या पदवीधरांनी विहीत नमुन्यातील अर्ज स्वाक्षरी करुन पदवीप्रमाणपत्र जोडून सदर अर्ज गुरुवार, दिनांक २ जुलै २०१५ पासून शुक्रवार, दिनांक ३१ जुलै, २०१५ पर्यंत कार्यालयीन वेळेच्या दिवशी विद्यापीठाच्या फोर्ट परिसरातील कॅश काऊंटर तसेच विद्यानगरी येथील महात्मा ज्योतिबा फुले भवन, (परीक्षा भवन) कॅश काऊंटर येथे सकाळी ११.०० ते दुपारी १.०० आणि दुपारी १.३० ते २.३० पर्यंत जमा करावेत.

डॉ. एम. ए. खान
कुलसचिव

मुंबई - ४०० ०३२

क्र.नि.वि./ ९६५-A/२०१५ २९ जून, २०१५

प्रत, माहितासाठी अग्रेषित:-

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभागप्रमुख,
प्राचार्य,सर्व संलग्नित महाविद्यालये व
सर जं.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख,
उपकुलसचिव (वित्त व लेखा), परीक्षा भवन, विद्यानगरी,
उपकुलसचिव (वित्त व लेखा), फोर्ट,
सहायक कुलसचिव (रत्नागिरी उपकेंद्र), रत्नागिरी,
सर्व वर्तमानपत्रांचे संपादक यांना विनामुल्य जाहिरांतीद्वारे प्रसिध्दी देण्यासाठी.

डॉ. एम. ए. खान
कुलसचिव

मुंबई - ४०० ०३२

टिप :- १) उपरोक्त माहिती विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळी उपलब्ध आहे.
२) कायदेशीर अर्थासाठी इंग्रजी कायद्याचा/परिपत्रकाचा संदर्भ पहावा.
३) निवडणूक/नामनिर्देशनासाठी इंग्रजी भाषेतील तरतुदी प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. (शासन पत्र क्र.युएसजी-२००९/(८५/०९) विशि-४ दि. ८ फेब्रुवारी २००९.)